**लोकमान्य अध्यापक विद्यालय,चिखलगाव**

दि.१२ जानेवारी २०१०

नाट्याशास्त्राचा प्रभावी अध्यापनासाठी उपयोग या विषयावर कार्यशाळा घेण्यासाठी येथे आलो.दोन दिवसात शाळेचा परिसर पाहिला.अतिशय स्वच्छ सुंदर परिसरात अतिशय मोकळा वातावरणात ही मुले शिकत आहेत.डी.एड.कॉलेज चे विद्यार्थी उद्याचे शिक्षक आहेत.अतिशय मेहनती आहेत आणि महाविद्यालयाकडून त्यांना अतिशय चांगला पाठिंबा मिळतो आहे.त्याच्या सोईसाठी त्यांना घडवण्यासाठी येथील सर्व कर्मचारी वर्ग अतिशय मनापासून मेहनत घेत आहे.

सर्वांना शुभेच्छा!

**मा.श्री. प्रकाश पारखी ९४२२३०३३०३**

आज दापोली दौऱ्यावर असताना चिखलगाव डी.टी.एड . अध्यापक विद्यालयास भेट दिली.

संस्थेचे अध्यक्ष श्री.राजा दांडेकर व शाळेच्या मुख्याध्यापिका रेणू दांडेकर यांचे समवेत विद्यालयाची पहाणी केली.चर्चा केली.एक ध्येय वेडे दाम्पत्य ,चिखलगावच्या माळावर शैक्षणिक क्रांती घडविण्यासाठी पूर्णपणे झोकून देऊन धडपडत आहेत.जेणेकरून ग्रामीण भारताच्या खऱ्या गरजा ओळखून सर्व विद्यार्थी स्वावलंबी जीवन जगू शकतील.

ग्रामीण भारत घडविण्यासाठी व विकसित करण्यासाठी ,ग्रामीण भागातील गरजा लक्षात घेवून त्यानुसार शिक्षण देणारी विद्यापीठे स्थापन झाली पाहिजेत,या ध्येयवादानुसार धडपणारे शिक्षक यातून निर्माण झाले पाहिजेत असे ,राष्ट्रपिता महात्मा गांधीजी म्हटले आहे.

महात्मा गांधींची उक्ती खरी ठरविण्यासाठीचे कार्य लोकमान्य सार्वजनिक धर्मादाय न्यास या संस्थेने लोकमान्य अध्यापक विद्यालयाच्या माध्यमानने हाती घेतल्याचे दिसून येत आहे.

लोकमान्य अध्यापक विद्यालय हे खऱ्या अर्थाने ग्रामीण विद्यापीठाचे स्वप्न साकार करीत असल्याचे आढळले.

संस्थेला, शाळेला व अध्यापक विद्यालयाला भावी प्रगतीसाठी हार्दिक शुभेच्छा. उत्कृष्ट उपक्रमांच्या अंमलबजावणीसाठी धन्यवाद!

**मा.श्री. भालचंद्र देसले, शिक्षण संचालक ,महाराष्ट्र राज्य ,पुणे-१**

दि.२२/०२/२०१०

शिक्षण प्रणालीचे मुख्य अंग आहेत :अध्ययन,अध्यापन,व्यवस्थापन व समन्वय व संवाद .आदर्श अध्यापक तयार करणे हे ह्या महाविद्यालयाचे प्रयोजन आहे. ग्रामीण शाळेसाठी चांगले अध्यापक तयार करायचे असतील तर अध्यापन महाविद्यालये ग्रामीण भागातच असायला हवी असे महात्मा गांधीनी म्हटलं होत. हे महाविद्यालय ह्याच ध्येयान प्रेरित होवून उभारल्या गेले आहे. हे सर्व प्रकल्पाहून मला एक नवीन प्रेरणा मिळाली आहे.संगणकाचा उपयोग अध्यापनामध्ये कसा होऊ शकेल ह्याच एक प्रेरणादायक प्रात्याक्षिक मला ह्या डी.एड.कॉलेजमध्ये करायला आवडेल.

**मा.श्री. डॉ.विजय भटकर (१०११०१०००)**

अशा प्रकारच्या शाळेत

तिचे सगळ्यांनी एकत्र

रहायचं...एकत्र जगायचं

एकत्र शिकायचं,एकत्र शिकवायचं... हे खूपच छान

आहे.....माणसातला नैसर्गिकपणा

जपणारं हे शिक्षण local

असून तितकच Global आहे....

गेल्या ३० वर्षातलं

या सगल्या वास्तूमधे दिसतं....

इथला प्रत्येक विद्यार्थी

बाहेरच्या जगात जगण्यासाठी

अतिशय समृद्ध नायक होऊ

शकतो......

शुभेच्छा!

**सौमित्र**

**किशोर कदम**

चिखलगावच्या कातळावर दांडेकर दांपत्याने सुरू केलेला हा जगण्याला शिकवण्याचा यज्ञ खूप आश्वासक वाटला.खूप वर्षे परिचय होता.ऐकूनही खूप होतो .मात्र येणे झाले नव्हते.पावसात भिजून आल्यानंतर ही संस्था अनुभवताना शरीरात आलेली उब भविष्यात जगण्यासाठी आणि जाणिवांच्या क्षेत्रात हुंदडताना निश्चित उपयोगी पडेल असा विश्वास वाटतो.

**मा.श्री. गांधी पत्रकार ,दापोली.**

दि.०२/१०/२०१०

आज एका उपक्रमशील अध्यापक विद्यालयाला भेट देण्याचा योग आला आाणि शिक्षकांकडून समाजाच्या आजच्या अपेक्षा आहेत त्या पूर्ण करण्यासाठी अध्यापक विद्यालय आपल्या साऱ्या शक्तीनिशी प्रयत्न करीत आहे.ही अत्यंत अभिनंदनीय बाब आहे.संस्थाचालक प्राचार्य ,शिक्षक यांचे सामूहिक योगदान ही उल्लेखनीय बाब आहे.शिस्त आणि उपक्रम यांचा समन्वय पहायला मिळाला.छात्रशिक्षकांनी गटचर्चा माध्यमातून मांडलेले विचार प्रगल्भ होते.त्याबद्दल त्यांचे मन:पूर्वक अभिनंदन ! प्राचार्य आणि सहकारी प्राध्यापक यांचा उत्साह कौतुकासर आहे.आपल्या शैक्षणिक कार्यास मन:पूर्वक शुभेच्छा !

**मा.डॉ. शकुंतला काळे,प्र.सहसंचालक,म.रा.शै.प्र प्र पुणे३०**

दि.२७ डिसेंबर २०१०

श्री.राजाभाऊ व रेणू दांडेकर या दोघांनाही भेटून व त्याजबरोबर येथील शिक्षण संस्थेची प्रगती पाहून फार आनंद झाला. शाळेतील एकंदर वातावरण कौतुकास्पद आहे.गेल्या वर्षी आलो होतो तेव्हांपासूनही संस्था प्रगतिपथावर असल्याची खात्री पटली व आनंद झाला.हीच प्रगती पुढेपण चालू राहो व आपल्या कार्यांत आपणांस यश ही इच्छा.

**मा.श्री. सदाशिव साने ,टोरांटो,कॅनडा**

## लोकमान्य सार्वजनिक धर्मादाय न्यास, चिखलगाव

दि.१० मार्च २००७

रेणूताई आणि डॉ.दांडेकर यांचे काम पाहून असे वाटले त्यांना ‘शिक्षणा’चा खरा अर्थ कळलेला आहे. शिक्षण आणि समाज यांची घट वीण विणली गेल्या शिवाय खऱ्या समाजाची प्रगती होणार नाही ,हे त्यांनी पक्के जाणलेले आहे.असे शिक्षक महादुर्मिळ.

**मा.श्रीम.रोहिणी पटवर्धन ,प्राचार्य एम.आय.टी कनिष्ठ महाविद्यालय ,पुणे ३**

दि.१७/१०/१९९७

डॉ.राजा व सौ.रेणू दांडेकर यांनी लोकमान्य टिळकांच्या गावी केलेले कार्य पाहण्याची संधी मिळाली.आमची भेट आय.सी.आय.सी.आय या विकास बॅंकेतर्फे होती.विकासाचे स्वप्न घेऊन दांडेकर दांपत्याने अथक प्रयत्न केले आहेत.समाजसेवेच्या त्यांच्या व्रतासाठी त्यांच्या बरोबर त्यांनी उत्कृष्ट साथीदार गोळा केले आहेत.गरीबांच्या मुलांवर संस्कार व्हावेत त्यांना उत्तम शिक्षण मिळावे यासाठी ही सारी धडपड आहे.स्वराज्याचे सुराज्य व्हायचे असेल तर देशाला अशा अनेक कार्यकर्त्यांची गरज आहे.भ्रष्टाचाराने पोखरलेल्या समाजापुढे असा आदर्श म्हणजे दीपस्तंभच होय.
त्यांच्या कार्यासाठी आमच्या शुभेच्छा.

**मा.डॉ.पांडुरंग हरी वैद्य ,महाव्यवस्थापक,आय.सी.आय.सी.आय,मुंबई.**

दि.१९/०१/१९९९

दापोली या विलक्षण सुंदर परिसरात डॉ.राजा व रेणू दांडेकर ज्या संस्कृतीची रूजवा करीत आहेत ती पाहून अनेकांना प्रेरणा मिळू शकेल,निराशावाद्यांच्या मनावरील मळभ जाऊ शकेल आणि एकटे-एकटे वाटणाऱ्यांना ,दिशाहीन - ध्येयहीन वाटणाऱ्यांना .दिशा व ध्येय मिळू शकेल.हा विश्वास.

**मा.श्री. कुमार केतकर**

दि.२१/०३/१९९९

डॉ.राजा व रेणू दांडेकर यांस शुभेच्छा!

**मा.श्री. व्यंकटेश माडगूळकर**

दि.२१/०३/१९९९

प्रिय राजा,

तुमचे काम अप्रतिम आहेच याची उत्तरोत्तर प्रगतीच होईल.आम्हां सारख्यांनाही आज्ञा करून कामाला लावा.

**मा.डॉ.किशोर भिंगारे**

श्री.दांडेकर

आज आपल्या संस्थेची शाळा व वसतिगृह पाहून लहानपणातल्या माझ्या शाळेची आठवण झाली.खूप झाडे लावावीत व त्याच्या गार सावलीत चित्रकलेचा एखादा वर्ग सुरू करावा ही इच्छा.

**मा.श्री. सुभाष अवचट**

दि.१ ऑगस्ट १९९३

आजवर आम्ही तरूण आमच्यापुढे आदर्श नाहीत असे म्हणत असू पण डॉ.राजा आणि रेणू दांडेकर यांच्यारूपाने ते आमच्या आसपास वावरत आहेत.याचा आज चिखलगावी साक्षात्कार झाला.

**मा.श्री. महेश म्हात्रे**

दि.२३/०२/१९९५

या भागात इथली शाळा अतिशय प्रामाणिक कार्यकरते हे बघून आनंद झाला.शिक्षणाचा प्रसार व मूल्य तसेच व्यवसायिक शिक्षण देण्याची संस्थेतील सर्व कार्यकर्त्यांना मन:पूर्वक अभिनंदन करते.

**मा.श्रीमती.बन्सलमॅडम,शिक्षण सचिव,शालेय शिक्षण विभाग,मंत्रलय,मुंबई ३२.**

.दि.०५/०३/१९९५

आज डॉ.राजा दांडेकर यांच्या समवेत चिखलगाव येथील आश्रमशाळा, ग्रंथालये, वसतीगृह इ.पाहण्याचा योग आला.

लोकमान्य टिळकांच्या या परिसरात येणाऱ्या सर्वांना येथे राहून वैचारिक लिखाण करण्याची व प्रेरणादायक काम करण्याची जाणीव होईल,अशी अपेक्षा आहे.

या निसर्गरम्य वातावरणातील शैक्षणिक मुक्त वातावरण वाखाणन्यासारखे आहे.

या उपक्रमास हार्दिक शुभेच्छा!

**मा.डॉ.बा.ए.सनान्से सहा.ग्रंथालय संचालक,मुंबई विभाग**

दि.०५/०३/१९९५

आज अचानक डॉ.दांडेकर यांच्या समावेत चिखलगावला पाहणीसाठी आलो.तेथील आश्रमशाळा ,वस्तीगृह ,व्यायामशाळा,ग्रंथालयेपाहून आनंद वाटला.

लोकमान्य टिळक या राष्ट्रपुरूषाच्या गावातील ही चांगली परिस्थिती असून नविन पिढीसमोर कायम त्यांचा आदर्श रहायला पाहिजे या दृष्टीने एकदम समाधान वाटले.या संस्थेचे आणखी नवीन उपक्रम उभारण्याचे कार्य सुरू आहे.

या नूतन उपक्रमास हार्दिक सुयश चिंततो.

**मा.श्री. गोविंद अहंकारी,जिल्हा माहिती आधिकारी.**

दि.०५/०३/१९९५

श्री व सौ दांडेकर यांना पडलेले स्वप्न साकार झालेलं पाहीलं आणि समाधान वाटले.संस्थेची अशी चहुअंगांनी भरभराट व्हावी ;ही मनोकामना.

**मा.श्री. श्रीरंग रोडगे**

संस्था पाहिली.आशीर्वाद.

असेच खपा.संस्था मोठी करा.

**मा.श्री. गोपाळ निळकंठ दांडेकर**

अखंडितलक्ष्मीअलंकृत सकलगुणालंकरण राजमान्य राजश्री श्रीमंत राजासाहेब दांडेकर आयुर्वेदाचार्य आणि अखंडितवज्रचुडेमंडित सकलसौभाग्यसंपन्न चिरंजीविनी रेणूताई दांडेकर प्रति निनाद गंगाधर बेडेकर दंडवत विशेष तरी आपण माळावर फुलवलेले नंदनवन न्याहाळण्याचा योग आला.ध्येयपूर्ति ही आनंददायी खरीच परंतु शिवछत्रपतींसारखाच निश्चय करून,बहुत जनांना आधार देऊन ,अखंड स्थितीचा निर्धार करून आपणही श्रीमंत योगी आणि श्रीमंत योगीनी झाला आहात.आपल्या कीर्तियशाचे डंके सत्पसागरापार जावोत हाच तुळजाभवानीकडे जोगवा.बहुत काय लिहणे ?आमचे अगत्य असो द्यावे. इति लेखन सीमा.

**फाल्गुन कृष्ण एकादश शिवशक३२१**

**मा.श्री. निनाद गंगाधर बेडेकर**

दि.०९/०४/१९९५

चिखलगाव येथील लोकमान्य टिळक यांचे स्मारक म्हणून सुरू केलेल्या शाळा पाहिल्या .शासनाने शाळा समूह योजनाच्या केंद्र प्राथमिक शाळा वगैरे राबविल्या जातात हे पाहून अतिव समाधान वाटले.डॉ.राजा दांडेकर यांच्या सारखे निस्पृह कार्यकत्ते  हे आपले जीवित कार्य समजून जी सेवा करीत आहेत त्याला तोड नाही .

त्यांच्या कार्यात त्यांचा सौ.रेणू ह्यांचा देखील योग्य वाटा आहे.त्यांच्या या कार्यास उत्तरोत्तर चढते यश लाभो,ही सदिच्छा .

**मा.श्री. श.द.फडके.(०२० ४५३३८४)**

**‘ द्रोणाचार्य ’ पुरस्कार प्राप्त क्रीडामहर्षी**

दि.१ ऑगस्ट १९९५

अध्यक्ष,विश्वमुर्ती बाळ व त्यांचे अन्य सहकारी व शिक्षक मंडळींचे मन:पूर्वक अभिनंदन करून संस्थेला उत्तरोत्तर उत्कर्ष व्हावा त्यासाठी सर्वत्तोपरी सहाय्य करण्याचे आश्वासन देतो.

**मा.श्री.गजानन कीर्तिकर गृहराज्य मंत्री,महाराष्ट्र शासन ,मंत्रालय ,मुंबई३२**

दि.७/०१/१९९६

आज दि.७/०१/१९९६रोजी शाळेस भेट दिली.डॉ.राजा दांडेकर यांचेशी विविध विषयांवर खुप चर्चा केली.ग्रामीण क्षेत्रात समाजाच्या सहकार्याने समाजासाठी कार्यक्रम उभे करण्याची क्षमता वाखाण्या लायक आहे. खूप काही बघीतले व खूप शिकलो अशा भावनेने परत जाण्यास मला आनंद वाटतो,डॉ.दांडेकर व सौ.दांडेकर यांना त्यांनी हाती घेतलेल्या कार्यात पूर्ण यश येवो अशी मी परमेश्र्वरास प्रार्थना करतो.

**मा.श्री. राजन फणसळकर ,सहसंचालक (शा.शि.)**

Date:28/01/1996

Visited along with wife in connection with 'lokotsav' organized .It was indeed an honour & also a pleasure. Work done by Dr.&Mrs. Dandekar & the members of his team toword connecting development,including education is praiseworthy .It needs not only encouragement but active support from a;; quarters.

Thanks for looking after us during our stay.Best wishes for all future projects & ndeavours.

**From Wg.cdr.s.mShukla,commandant,Bhosala Military School,Nashik**.

दि.२१/०२/१९९६

आज दि.२१/०२/१९९६ रोजी चिखलगाव येथील दांडेकर पती पत्नींनी चालविलेल्या प्रकल्पाला भेट देण्याचा योग आला .या दुर्गम भागात हे तरूण जोडपे निर्मितिचा आनंद घेताना पाहू न थोडा फार हेवा ही वाटला.

ज्या मातीत माणसे जन्मतात त्या मातीशी त्यांचे इमान शाबूत ठेवण्याचे अतिकठीण काम त्यांनी हाती घेतले.या देशांतील युवाशक्ती आपल्या गावाकडे पहात नाही.(थोडे फार शिकून झाल्यावर ) ही सर्वात मोठी शोकांतिका आहे.हे घडू शकते .या दृष्टीने 'चिखलगांवचा हा प्रकल्प' पथदर्शक ठरेल या विषयी आशादायी आहे.

'जीवनम् सत्य शोधनम् 'हा साक्षात्कार नजिकच्या काळातच येथे प्रत्यक्षात दिसून आला तर मला आश्चर्य वाटणार नाही.

श्री.व सौ.दांडेकरांना व त्यांच्या सहकाऱ्यांना शुभेच्छा !

**मा.श्री. म.वि. कौंडिण्य**

दि.२१/०२/१९९६

आज दि.२१/०२/१९९६ रोजी आदरणीय प्राचार्य कौंडिण्य यांचेबरोबर डॉ.राजा दांडेकर व सौ.रेणू दांडेकर या दांपत्याने चालविलेले कार्य पहाण्याचा योग आला .आनंद वाटला. हे पहाताना या देशाचे भवितव्य उज्वल असल्याचा प्रत्यय येतो. ‘जे का रंजले गांजले ’ या संततुकारामांच्या अभंगाची आठवण झाली.दांडेकर यांचे कार्य याची प्रचिती देते.आज मला संतसंगती घडली येवढेच म्हणतो.

**मा.श्री. दि.य.शेलार,जिल्हा व सत्र न्यायाधीश(निवृत्त),संगमनेर**

दि.०४/०३/१९९६

लोकमान्य टिळक विद्यामंदीर चिखलगाव या प्रकल्पाला भेटण्याची,अभ्यासण्याची संधी डॉ.राजा दांडेकर व सौ.रेणू दांडेकर यांच्या अलिकडच्याच परिचयामुळे ,लगेचच घ्यावीशी वाटली व सहकारी कार्यकर्त्यांसह आज विनाविलंब ती घेतली.प्रकल्प,त्याच्यामागची विचारधारणा व त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी यामध्ये उक्ती व कृती याची सुसंगती आढळली .प्रकल्पातले काम निर्मिती पाहून आनंद न वाटला ,तरच नवल! पण आमच्या सारख्या दीपस्तंभी रस्ता शोधण्याऱ्यांना त्यातून प्रेरणेचा दिवाही दिसला.

‘ खेडेगांवतील कार्य ’यावर नुसतेच बोलणाऱ्यांसाठी हा आदर्शच नव्हे तर अनुकरणीय असणारा उपक्रम !याची आर्वतने जितकी वाढतील तितके मनातील संभ्रम लवकरात लवकर कमी होतील.

अभिवादनासह शुभेच्छा!

**मा.श्री. विद्याधर निमकर (चतुरंग प्रतिष्ठान करिता)**

**दि.१७/०२/२००६**

लोकमान्य टिळक विद्यामंदीर भारतातील मी पाहिलेले एकमेव हायस्कूल आहे जे तळागाळातील बहुजनांच्या मुलांना तांत्रिक शिक्षणाची ओळख इयत्ता पहिलीपासून देतात.डॉ.राजा दांडेकर तसेच सौ.रेणूजी दांडेकर यांनी आपले कुटुंब म्हणजे ही शाळा असं समजून आजपर्यंत सेवा केली आहे.त्यामुळे मी या शाळेकडे जास्त ओढला गेलो.मनस्वी शुभेच्छा!

**मा.श्री. इकबाल परकार**

शिक्षण करू ‘असावं’ विद्यार्थ्यांना स्वतःच्या पायावर उभं करणारं,अथवा जगाच्या बाजारपेठेत स्वस्थानं निर्माण करण्याची क्षमता स्थापतिं करणारं.पूर्वीचं शिक्षण ,मध्यमकालीन शिक्षण आणि आजचं.तुमची दृष्टी व प्रत्यक्ष अवलंबन यामुळेच टिळकांच्या या पुण्यभूमीत लोकसाधना करीत असलेल सामाजिक शिक्षणाचा यज्ञ असाच वृध्दीगंत होत राहो.

**मा.श्री. दा.भा.यादव ,राहुरी,अहमदनगर**

Date:17/02/2007

The institution Lokmanya Trust doing good for the student of gross root level ,school doing , work for the student for their wellfare of future .It is Appriciable.

**Mr.B.S.Patel**

दि..१६/०७/२००७

लोकमान्यांच्या जन्मगावी राष्ट्रातील युवक वर्गानं प्रेरणा घ्यावी असं झकास काम पाहून मी सुखावलो.माझ्याशी संवाद केला आणि येथेच अनुभवतोय मलाही अजुन बरीच वाटचाल करायची .

येथील कामाचा वटवृक्ष विस्तारावा.ईशान्य भारतातील युवकांशी आदानप्रदान व्हावे अशी विनंती व प्रार्थना.

**मा.श्री. रवीसावदेकर, आसाम**

**फोन नं०३७७५० -२७३३०३**

Date: 16/07/2007

Respected shri & Smt.Dandekar,

Inspiring and innovative experiment .We would like to associate with this institution to bring developmental changes in North-Eastern part of India.

Lalita DiDi

,Assam

दि.०१/०८/२००७

डॉ.राजा दांडेकर आणि सौ.रेणूजी दांडेकर यांचे येथील कार्य पाहून प्रभावीत झालो.फक्त पुस्तकी शिक्षण न देता त्याचबरोबर व्यवसाायिक प्रशिक्षणाची साथ दिल्याने विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास दिसून आला. सर्वच शाळेमध्ये अशा प्रकारचे शिक्षण दिल्यास देशाची प्रगती तीव्र गतीने येईल.संस्थेच्या कार्यस मी सुयश चिंतीतो .

**मा.श्री. विजय मेहता कुलगुरू,डॉ.बाबासाहेब को.कृ .वि.,दापोली**

दि.१ ऑगस्ट २००७

दापोली तालुक्यातील चिखलगाव ह्या खेडेगावांतील एक आदर्श शैक्षणिक संस्था पाहिली .जीवन शिक्षण ,उद्योग शिक्षण , सर्व विद्याशाखेतील उच्च शिक्षण देणारी संस्था असं थोडक्यात वर्णन करता येईल.सौ.रेणू दांडेकर व डॉ.राजा दांडेकर ह्यांच्या त्यागावर भावतता . उच्च शिखरावर गेलेली ही संस्था असून भविष्यातील 'लोकमान्य टिळक' त्याच्यात पुण्यभूमीत तयार करण्याच काम करीत असलेल्या दांडेकर व्दयींना दंडवत.आणि शुभेच्छा!

**मा.डॉ.अशोक पोवार संचालक (विस्तार विभाग ) डॉ.बाबासाहेब को.कृ .वि.,दापोली**

दि.११/०४/२००८

आपण चालवत असलेली शाळा तिथलं जीवनोपयोगी शिक्षण हे सर्व पाहिल्यावर एक आदर्श संस्था जवळून पाहता आल्याचे समाधान मिळाले.

हे सर्व उभे करण्यासाठी आपण उभयतांनी केलेले अविश्रांत परिश्रम ,स्वार्थत्याग व संपूर्ण समर्पित वृत्ती क्वचितच कुठे पहायला मिळते.आपण करीत असलेल्या कामामध्ये मनापासून रममाण झाल्यामुळेच हे आपल्या हातून झाले.त्यासाठी आपले मनःपूर्वक अभिनंदन.

**मा.श्री.उल्हास मा. पेठे व सौ.माधुरी उ.पेठे,मे.वामन हरी पेठे,जुएलर ,मुंबई.**

दि.११/०४/२००८

आजचा दिवस माझ्यासाठी कायम स्मरणात राहाणारा राहील बऱ्यांच संस्थांशी माझा जवळून संबंध आला आहे,पण आपल्या उभयंतांचे कामाला नमस्कार करण्याची संधी मिळाली हे माझे भाग्य समजतो.

**मा.श्री.प.अ.डोंगरे**

दि.१२ एप्रिल २००८

प्रिय राजा मामा व सौ.रेणू मामी,

तुमचे शिक्षण क्षेत्रातील काम खरोखर प्रशंसनीय आहे. तुमच्या कार्यांची व्याप्ती पाहून मला महिर्षी कर्वे यांच्या कार्याची आवर्जून आठवण झाली.तुमचे हे काम असेच उत्तरोत्तर प्रगती करत राहो ही सदिच्छा .तुमच्या या कार्यात आम्ही आमच्या परीने सहभागी होत राहू याची शाश्वती देतो.

**मा.श्री. धनंजय कुंटे.**

राजा आणि राणी(रेणू)

''निसर्गरम्य हिरवागार परिसर ,बनवण्याऱ्या त्या अदृष्य नियंत्याची इच्छा म्हणूनच ,त्याने उभयतांचे चार हात ,प्रचंड इच्छाशक्ती ,उत्कट चैतन्याचा स्त्रोत ,कष्टाची प्रेरणा, देऊन हे 'त्याच्या गरजेचे 'जे लीला नाट्य घडवले ,त्याचं दर्शन घडवल्याबद्दल त्या समर्थ शक्तीस दंडवत ,आणि आपणासाठी उदंड उदंड शुभ आशीर्वाद ,यापेक्षा अधिक -ते काय ?''

**मा. श्रीम. सुनेत्रा पंडित ,अ/६ गौरीशंकर ,रामलाल चौक ,सोलापूर .२७२०७०७**

दि.२६/०७/२००८

आज दि . २६/०७/२००८रोजी लोकमान्य अध्यापक विद्यालय चिखलगाव जि.रत्नागिरी या अध्यापक विद्यालयाच्या पडताळणीसाठी भेट दिली .प्रस्तुत संस्थेचे कार्य ग्रामीण विकासाच्या दृष्टिने उल्लेखनीय आहे.

**मा.श्री. जाधव साहेब ,शिक्षण उपसंचालक ,कोल्हापूर विभाग ,कोल्हापूर.**

दि.०२/१०/२००८

दांडेकर दाम्पत्यानं उभं केलेलं काम न्याहाळण्यासाठी संधी मला मिळाली .मनातनं खूप समाधान मिळालं .सामुहिक विकासासाठी झटताना वैयक्तिक आवडी-निवडी जोपासण्याचा खूप चांगला आदर्श उभा केला आहे.समाजसेवा करताना रखरखीतच जगलं पाहिजे असं नाही.रसपूर्ण आयुष्य उपभोगत दुसऱ्यांना मदतीचा हात देता येतो.आम्ही खूप शिकलो.

**मा.श्री. अजय आंबेकर /ज्योती आंबेकर**

दि.१३/१२/२००८

कोकणात अंधश्रध्देमुळे आई मुलीला शिक्षणास पाठवत नसे.त्यामुळे दांडेकर दांपत्याने ‘ आई ’ला प्रथम सुशिक्षीत केले व मगच मुलीला शिक्षणांची गोडी लावली.

आपले कार्य खरोखरच स्पहणीय तर असेल परंतु आपण मनाची श्रीमंती दाखवून पैशाच्या श्रीमंतीवर मात केली. आपल्या कार्यास हार्दिक शुभेच्छा!

**मा.श्री. उज्ज्वल निकम**

दि.१३/१२/२००८

डॉ.राजाभाऊ आणि रेणूताईचे चिखलगांव आणि येथे येणे हा आनंद अनपेक्षितपणे पुणतांबेकर पुरस्काराच्या निमित्ताने मिळाला.नवनिर्मिती आणि परिवर्तन कसं घडते आहे. याचा हा जिवंत अनुभव प्रत्यक्ष अनुभवणे हाच आनंद येथे मिळतो आहे.

नवनिर्मिती ही प्रयोगशाळा सर्वासमाजाची होणे आणि ही प्रक्रिया गतिमान होवोही शुभेच्छा!

**मा.प्राचार्य डॉ.सुभाष देव ,गोगटे जोगळेकर महाविद्यालय ,रत्नागिरी.**

दि.०६/०२/२००९

प्रिय राजा राणी,

माहीत नाही;कशामुळे,

पण इथं मी रमलो अन् प्रसन्न वाटलं खूप.

हे खरं काम मुलभूत .त्या तुलनेत

आपलं काम फार दुय्यम,

असं मला वाटून गेलं!

मी आहे तुमच्यासोबत,

एवढंच आश्वासन

या निमित्ताने.

धन्यवाद .मी कृतज्ञ आहे.

तुमच्या राज्यातील एक सैनिक,

**मा.श्री.संजय आवटे,सहसंपादक ,लोकसत्ता**

दि.०६/०२/२००९

आज चिखलगावातील या शाळेत भेट देण्याचा योग आला. इथे डॉ.दांडेकर दापत्यांनी उभ्या केलेल्या शाळेबाबत खूप ऐकल होते.दोन वर्षापूर्वी रेणूताईना श्रीमती बाया कर्वे पुरस्कार देण्याचे भाग्य मला मिळाले.इथले त्यांचे कार्य पहावयास मिळाले.आनंद वाटला, असे मुलभुत काम करणारी माणसे हीच खरी आपली संपत्ती आहे.

**मा.डॉ.अरूण निगवेकर,माजी अध्यक्ष युजीसी,माजी कुलगुरू पुणे विद्यापीठ.**

दि.०६/०२/२००९

इथं आल्यावर प्रत्येक क्षण हा अनुभवण्यासारखा आहे.अनेक वर्षापूर्वी एका उन्हाळी दुपारी भकास माळावर संस्थेचा संकल्पेचा जन्म झाला. तेव्हा राजा दांडेकर यांचे हे स्वप्न साकारेल याबद्दल बिलकूल विश्वास नव्हता.आज भेट दिल्यावर मलाच नवचैतन्य मिळाले आहे.कामाचे कौतुक करण्याची हरकत मी करणार नाही. मात्र या कार्यात थोडाफार हातभार लागला तर धन्य वाटेल.सदिच्छा तर सदैव असतीलच.

**मा.डॉ.राजेंद्र जगदाळे ,महासंचालक ,सायन्स व टेक्नॉलॉजी पार्क,पुणे विद्यापीठ आवार,पूणे७**

दिनांक - १२/०२/२००९

शाळा बांधणीपासून चालवण्यापर्यंत , विद्यार्थी निर्मितीपासून त्यांच्याकडून समाजाशी बांधिलकी करून घेण्यापर्यंत , निसर्गाशी मिळवणूक करून निसर्गप्रधान मनोवृत्तीची जुळवणुक करण्यापर्यंत , विद्यावाहिनीचा प्रवाहात भिजत भिजत अंधाराचा प्रकाश करण्यापर्यंत हे कार्य तसेच काळाच्या ओघात , कल्पनांच्या कुंड्या फुलवत ज्ञानाच्या वाटा सजवा !

**मा.श्री.प्रोफेसर डॉ. सोहन मोडक**

दिनांक - १६/०२/२००९

लोकमान्यांसारख्या टोलेजंग व्यक्तिमत्वाला साजेसे असे स्मारक त्यांच्या जन्मगावी पाहून अतिशय समाधान वाटले. स्वतःच्या पलीकडे जाऊन समाजासाठी , उमलत्या पिढीसाठी आणि त्यातही करून तळागाळातील मुलांना वर आणण्यासाठी दांडेकर दांपत्याने हा जो काही यज्ञ मांडला आहे. त्यात समीधा म्हणून सर्वांचा सहभाग असावा , त्यांच्या कार्याला प्रोत्साहन मिळावे ही समाजाकडून अपेक्षा !

**मा.श्री. प्रा. सुहास राणे**

दिनांक - २१/०२/२००९

अखंडित लक्ष्मी आलंकृत सकल गुणालंकरण राजमान्य राजश्री श्रीमंत राजाभाऊ दाण्डेकर प्रति निनाद बेडेकर दण्डवत . विशेष तरी, आपल्या आणि सौ. रेणू यांच्या ध्येयाचा आणि कर्तृत्वाचा बहर आज पाहिला. पूर्वी आलो होतो त्यावेळी माळरान होते , आता वटवृक्ष होण्याची वाटचाल सुरू झाली हे दिसून आले. आपल्या उभयतांच्या ध्येयांची आणि आकांक्षाची पूर्ती लवकरात लवकर होवो आणि आपल्या शाळेच्या कीर्तियशाचे डंके सप्तसागरापार जावोत हाच तुळजाभवानीकडे जोगवा.

**मा.श्री. निनाद बेडेकर**

दिनांक- २६/०२/२००९

आज दिनांक २६ फेब्रु. २००९ रोजी शाळेस भेट दिली. आदरणीय सौ.रेणूताई दांडेकर वा डॉ. राजा दांडेकर साहेब यांची भेट झाली. चर्चा झाली. एक आदर्श व उपक्रम राबविणारी शाळा म्हणून या शाळेचा लौकिक आहे. प्रत्यक्ष अनुभव घेतला. ग्रामीण भागातील शैक्षणिक व सामाजिक प्रबोधनाचे केंद्र म्हणून शाळेच्या कार्यास शुभेच्छा.

**मा.श्री. आमदार रामनाथ मोते**

दिनांक-१०/०३/२००९

आज पुतण्या चि.जयदत्त याचे निमित्ताने आपले शाळेस व आपणांस प्रत्यक्ष भेटलो. आपल्या कामाची व नावाची जी सुकिर्ती ऐकली त्याचा अनुभव प्रत्ययास आला. शाळेचे वातावरण, येथील प्रत्येक बोर्डावर प्रतीत विचार विकसीत आत्म्याचे व कल्याणप्रद शिक्षणाचेच धडे देतात हे दिसते. परम्पुजनीय बाळ गंगाधर तथा लोकमान्य टिळकांचे कर्तुत्वाचे स्फुल्लिंग आपण तेजत ठेवलेच असल्याचे जाणवले. समाजाचे हे कर्तव्य आपण खांद्यावर घेऊन समर्थपणे वाहत आहात. ह्याबद्दल समाजाचा एक अतिशय लहानसा घटक म्हणून समाजातर्फे अतीव धन्यवाद.

**मा.श्री. न्यायाधीश श्री. खोचे**

Date- 21/3/2010

A Couple dedicated to educate needy students from village met me a year back Today I was lucky to meet – Dr. Dandekar at his workplace . I have no words to praise the efforts of Mr. & Mrs. Dandekar.

I Wish Mr.& Mrs. Dandekar. All the best. I am sure in near Future a mini university would ready at chikhakgaon.

**Justice R.Y.Ganoo. High Court Bombay.**

दिनांक - १/८/२०१०

लोकमान्यांच्या गावात लोकमान्यांच्या नावात साजेल असा प्रकल्प दांडेकर दांम्पत्यांच्या परिश्रमातुन साकारला आहे. चिखलगावी येऊन एकेक वास्तुंचे दर्शन घेतल्यानंतर मिळालेला हा एक बोनस .

स्वतः लोकमान्यांच्या कामाची सुरुवात शैक्षणिक क्षेत्रातून झाली हा एक योगायोग नसुन त्यामागे एक जीवनदृष्टी होती. ती समोर ठेऊन चालवलेल्या या शाळेस व संस्थेस मनःपूर्वक शुभेच्छा!

**मा.श्री. सदानंद मोरे ,पुणे.**

दिनांक - १७/०८/२०१०

खर तर राजाभाऊ व रेणूताई यांच्या ह्या शून्यातून विश्व उभारण्याच्या प्रयोगाविषयी,थोडक्यात ( आणि विस्ताराने सुध्दा) बोलणेच अशक्य आहे.एकाच शब्दात सांगायचे तर unbelievable!

**मा.श्री. महेश नेरुरकर**

दिनांक - २५/१०/२०१०

चिखलगाव लोकमान्य टिळकांचे जन्मगाव.अशा या ऐतिहासीक पार्श्वभूमी लाभलेल्या या गावात डॉ.दांडेकर कुटुंबिय आणि त्यांचे सहकारी,ट्रस्ट मंडळी यांनी जे समाज उपयुक्त प्रकल्प तन - मन -धन लावून उभे केले व त्यामुळे या भागातील उपेक्षित बिलो पॉर्व्हटी लेव्हलमधील मुला मुलींना प्राक्टिकल शिक्षण उपलब्ध करुन दिले.त्यामुळे हे ऐतिहासिक आणि महान कार्य सुरु आहे व पुढेही वर्षे न वर्षे सुरु राहील याबद्दल तिळमात्र ही शंका नाही.

या ऐतिहासिक प्रकल्पासाठी आमचा खारीच्या वाट्याने सहभाग आहे याचा अतिशय आनंद होत आहे. त्यांचे हे कार्य उतरोत्तर वाढत राहो व त्यामध्ये आमचाही सहभाग नेहमीच राहील अशी ग्वाही देतो. परत एकदा डॉ.दांडेकर कुटुंब व ट्रस्ट मंडळी व त्यांचे सहकारी यांचे ह्रदयापासून अभिनंदन करतो.

**मा.श्री.अशोक जैन**

**जैन इरीगेशन सिस्टीम लि.जळगाव**

दि.७ फेब्रुवारी २०११

डॉ.राजा दांडेकर कोकणातील असल्याने आमच्या पूर्वीपासून म्हणजे आमच्या व त्यांच्या लहानपणापासून ओळखीचे. वेगळीवाट चोखंदळणे हे कोकणातील अनेकांना खूप खूप आवडते नव्हे त्यांचा तो छंदच नव्हे त्यांचा तो जीवनक्रमच असतो.श्रीमान राजाभाऊ त्यातलेच .आज त्यांच्या कार्याचा परिचय झाला.इतके मूलभूत व सखोल कार्यफक्त त्यांच्यासारखे डेडीकेटेड व्यक्तिमत्वच करू शकणार अशी कल्पना होती त्याची आज खात्री झाली.येथील सर्व स्टाफ हा ही एकाविचाराने भारावून गेलेला व ध्येयवेडा भावला .सनईचे सूर अत्तराचा सुगंध सर्वानाच नवी उमेद व उर्मी देतो व कार्यप्रवण करतो तसेच सौ.व श्री.दांडेकरांचे कार्य वाटले/भासले.विषेश म्हणजे हे सर्व त्यागावर आधारित असल्याने त्या कार्याची इंटेनसिटी व व्याप्ती कल्पनेच्या पलिकडची आहे.कौतूक करावे तेवढे ते अपुरे, अधुरे व थिटेच आहे.अशा कार्याला शुभेच्छा देण्याचा तरी नैतिक अधिकार आम्हाला आहे की नाही अशी शंकाच वाटते! पण शुभेच्छा दिल्याने कार्याची प्रगती वेगाने व सखोल होईल असे वाटल्याने मनापासून शुभेच्छा!

**मा. श्री. माधव कर्वे. IG/CID Crime, Pune, Maharashtra.**

दि.७ फेब्रुवारी २०११

डॉ.राजा दांडेकर कोकणातील असल्याने आमच्या पूर्वीपासून म्हणजे आमच्या व त्यांच्या लहानपणापासून ओळखीचे. वेगळीवाट चोखंदळणे हे कोकणातील अनेकांना खूप खूप आवडते नव्हे त्यांचा तो छंदच नव्हे त्यांचा तो

जीवनक्रमच असतो.श्रीमान राजाभाऊ त्यातलेच .आज त्यांच्या कार्याचा परिचय झाला.इतके मूलभूत व सखोल कार्यफक्त त्यांच्यासारखे डेडीकेटेड व्यक्तिमत्वच करू शकणार अशी कल्पना होती त्याची आज खात्री झाली.येथील सर्व स्टाफ हा ही एकाविचाराने भारावून गेलेला व ध्येयवेडा भावला .सनईचे सूर अत्तराचा सुगंध सर्वानाच नवी उमेद व उर्मी देतो व कार्यप्रवण करतो तसेच सौ.व श्री.दांडेकरांचे कार्य वाटले/भासले.विषेश म्हणजे हे सर्व त्यागावर आधारित असल्याने त्या कार्याची इंटेनसिटी व व्याप्ती कल्पनेच्या पलिकडची आहे.कौतूक करावे तेवढे ते अपुरे, अधुरे व थिटेच आहे.अशा कार्याला शुभेच्छा देण्याचा तरी नैतिक अधिकार आम्हाला आहे की नाही अशी शंकाच वाटते! पण शुभेच्छा दिल्याने कार्याची प्रगती वेगाने व सखोल होईल असे वाटल्याने मनापासून शुभेच्छा!

**मा.श्री.माधव कर्वे.IG/CID Crime ,Pune,Maharashtra.**

Date- 22/2/2010

Lokamanya Tilak Vidyamandir is a Path finding Experiment in school education.This Experiment can show the nation how we can implement the good of universal education for a want cantly of 110 Billion people resending justly in the 6 lakhs Villages like Chikhalgaon. I am inspired by the dedication of & Renutai & Raja Dandekar who created this vidyamandir.

**Mr.Vijay Bhatkar.**

Date: 11/04/2008

Dr.Raja Dandekar is doing a great selfless work ,and running the institution on grace of God .May the Almight gives him strength of take his work to glorious hights.

Mr.Sunil

Date :11/04/2008

I am deeply impressed to see selfless and dedicated work done by Dr.Raja Dandekar at chikhalgaon .He has truly demonstrated how do we follow the xample of great men. He established education trust and imparthy for education to students especially girl students Mra.Dandekar saceities her 28 years Both Dandekar are beyond description .Society meets to help and assist such noble imitative .My best wishes & salute to Dr.Dandekar.

Mr.Ratnakar Gayakwad